# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ६०३ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक १४/११/२०१८

## पंडित जवाहरलाल नेहरु यांची जंयती

भंडारा:– पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. १४/११/२०१८ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू, यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधिक्षक(गृह) बंडोपंत बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन पंडित जवाहरला नेहरु जंयती साजरी करण्यात आली. त्याचा जिवण पट व केलेल्या विधायक कार्याबाबत माहीती देण्यात आली.

भारताचे पहिले पंतप्रधान स्वांतत्र्य आंदोलनातील एक आघाडीचे नेते, महात्मा गांधीचे आवडते शिष्य पंडित जवाहरलाल नेहरु हे १८५७ च्या युध्द् काळात नेहरु घराने अलाहाबादेत येवून तेथेच कायमचे राहू लागले. लहाणपणा पासूनच जवाहर अत्र्यांत श्रीमंत व पाश्चात्य जिवन पध्दतीत वाढले. त्याची साधी राहणी, सुस्पष्ट विचार होते. भारतात १९२७ साली सायमन कमिशन आले होते. काग्रेसने त्या विरुध्द् लखणौला जी निदर्शने केली त्यात पोलीसांनी केलेल्या लाठी मारात जवाहरलाल जखमी झाले. १९२९ साली लाहौरला कॉग्रेसचे अधिवेशन भरले त्याचे अध्यक्ष पद जवाहरलाल यांना मिळाले. त्यांनी अधिवेशनात भारताचा संपूर्ण स्वातत्र्याचा ठराव मांडला व मंजूर करुण घेतला. स्वातंत्र्या मिळविण्यासाठी कमला नेहरुनी सुध्द्ा फार सहकार्य केले. पुढे १९४२ च्या **''चले जाव ''** आंदोलनात ९ ऑगस्ट १९४२ ते २८ मार्च १९४५ पर्यत नेहरु आणि अनेक कार्यकर्ते यांना अहमदनगरच्या किल्यात इंग्रज सरकारने बंद करुन ठेवले होते. तेथे नेहरुंनी **''डिस्कव्हरी ऑफ इंडिया''** भारताच्या इतिहासावरील मोठा ग्रंथ लिहला.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताचे दोन तुकडे झाले व दोन राष्ट्रे जन्माला आली. भारत स्वतंत्र झाला. जवाहरलाल नेहरु स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले व त्याच्या हस्ते दिल्लीला लाल किल्यावर अशोक चक्रांकित तिरंगा ध्वज फडविण्यात आला. पंडितजींनी भारतीय जनतेला संदेश दिला. देशाच्या भल्यासाठी सर्वांनी अपार कष्ट केले पाहिजे. **आराम हराम आहे.** त्यांनी १६ वर्ष पंतप्रधान पदाची जवाबदारी सांभाळली होती. ते आजारी पडले आणि २७ मे १९६४ रोजी

मृत्यु पावले. त्याच्या मृत्युने सारा भारत हळहळला अश्या या थोर पुरुषाची आज आपण साजरी करीत आहोत.

यावेळी कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक कोरेटी जिवीशा भंडारा, पोलीस निरीक्षक मानकर स्थागुशा भंडारा, पोलीस निरीक्षक सोलसे आर्थीक गुन्हे शाखा भंडारा, सहायक पोलीस निरीक्षक पुसाटे सायबर भंडारा, सहायक पोलीस निरीक्षक पोटे स्थागुशा भंडारा, सहायक पोलीस निरीक्षक. काळे स्थागुशा भंडारा, सहायक पोलीस निरीक्षक लाबांडे वाचक शाखा भंडारा. पोलीस उपनिरीक्षक आडोळे जनसंपर्क अधिकारी भंडारा, महिला पोलीस उपनिरीक्षक लांजेवार महिला सेल भंडारा, आर.सी पी. क्यु. आर.टी. राखीव पोलीस निरीक्षक वर्मा व पोलीस उपनिरीक्षक प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.